आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३१ जुलै २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेला आणखी ५ वर्षांची मुदतवाढ, खेलो इंडिया मोहिमेच्या विस्ताराला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- गदारोळामुळं आजही संसदेचं कामकाज बाधित, उशिरा होणाऱ्या जन्म-मृत्यू प्रकरणांच्या नोंदीसंदर्भातलं विधेयक लोकसभेत चर्चेशिवाय मंजूर

- भिवंडी इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत १० जणांचा मृत्यू, केंद्र आणि राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

**आणि**

- अल्जेरियात बस अपघातात २५ जणांचा मृत्यू, ४४ जण जखमी

**<><><><><>**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेला आणखी ५ वर्ष मुदतवाढ द्यायला केंद्र सरकारनं मान्यता दिली आहे. त्यासाठी ३ लाख १५ हजार कोटी रुपयांचा निधी केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आजच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. आतापर्यंत २३ हप्त्यांच्या माध्यमातून सुमारे साडे ४ लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्याची माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. यामुळं शेतकऱ्यांचं, खासगी सावकार किंवा इतरांकडून कर्ज घेण्याचं प्रमाण कमी झाल्याचं ते म्हणाले. केंद्रीय मंत्रीमंडळानं प्रधानमंत्री सूर्य सरोवर योजनेलाही आज मंजुरी दिली. यासाठी ५ हजार ७० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. खेलो इंडिया योजनेचा विस्तार करायलाही मंत्रीमंडळानं मान्यता दिली आहे. शाळेपासून ते ऑलिम्पिकपदकापर्यंतचा खेळाडूंचा प्रवास सुलभ करण्यासाठी ही योजना असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**होल्ड - अश्विनी वैष्णव बाइट**

तेल उत्खननाला चालना मिळावी यासाठी समुद्र ८४ हजार कोटी रुपयांच्या मंथन योजनेलाही आजच्या मंत्रीमंडळ बैठकी मंजुरी मिळाली.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज युनायटेड किंग्डमचे नवनियुक्त प्रधानमंत्री अँडी बर्नहम यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा केली आणि पदभार स्वीकारल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं. तंत्रज्ञान, नवसंशोधन, संरक्षण, सुरक्षा, स्वच्छ ऊर्जा, शिक्षण यासारख्या विषयांवर सहकार्य करण्यावर दोन्ही देशांनी यावेळी सहमती व्यक्त केली.

**<><><><>**

विद्यार्थी आंदोलनादरम्यान पोलीस कारवाईसह विविध मुद्द्यांवरून विरोधकांनी घोषणाबाजी केल्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

त्यापूर्वी गोंधळातच लोकसभेत जन्म - मृत्यू नोंदणी सुधारणा विधेयक मंजूर करण्यात आलं. जन्म आणि मृत्यूच्या एक वर्षानंतर आणि २ वर्ष कालावधी पूर्वी नोंदणी करायची असेल तर याअंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी लागेल. जन्म-मृत्यू नंतर २ वर्षांनी नोंदणी केली तर प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक असेल. या विधेयकावर चर्चा करावी असं सरकारचं आवाहन विरोधकांनी फेटाळून लावलं आणि गदारोळ सुरूच ठेवल्यानं त्यातच हे विधेयक मंजूर झालं.

लोकसभेतले विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांच्याविरुद्ध भाजपाचे अनुराग ठाकूर यांनी हक्कभंग प्रस्तावाची नोटीस दिली आहे. पेपरफुटीविरोधी विधेयकावर चर्चेदरम्यान गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर खोटे आरोप केल्याचं सांगत गांधी यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी त्यांनी सभापतींकडे केली आहे.

राम मंदिर देणगी अपहार प्रकरणी काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या खासदारांनी संसद भवन परिसरात आंदोलन केलं. MPSC तसंच MHCET परीक्षेत घोटाळा झाल्याचा आरोप करत महाराष्ट्रातल्या काँग्रेस खासदारांनी आज संसद भवन परिसरात निदर्शनं केली. झारखंड राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पेपर फुटी प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी करत भाजपा खासदारांनी आंदोलन केलं.

**<><><><><>**

रस्त्यांवर गुराढोरांमुळे होणाऱ्या अपघातांप्रकरणी पीडितांना नुकसानभरपाई देण्यासाठी स्पष्ट नियमावली तयार करावी असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने आज केंद्र आणि राज्य सरकारांना दिले आहेत. ही जनावरं आपापल्या आसऱ्यात सुरक्षितपणे परत आणण्याची जबाबदारी त्यांच्या मालकांची आहे, असं न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती कोटीश्वर सिंग यांच्या पीठानं स्पंष्ट केलं. सर्व जनावरांना पट्टा घालणं, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणं, लस देणं, या बाबी अनिवार्य केल्या पाहीजेत, असं न्यायालयाने सुचवलं आहे. सध्या या बाबतीत सर्व राज्यांमधे वेगवेगळे नियम लागू होतात.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात भिवंडी इथं काल रात्री कोहिनूर ही चार मजल्यांची इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत १० जणांचा मृत्यू झाला. NDRF, भिवंडी अग्निशमन दल आणि स्थानिक प्रशासनानं याठिकाणी मदत आणि बचावकार्य राबवलं. स्थानिक प्रशासनानं ही इमारत रिकामी करण्याचे आदेश दिले होते. त्यातून २५ लोकांना सुरक्षित स्थळी हलवलं होतं. तरीही कंत्राटदारानं दुरुस्तीचे काम सुरू ठेवल्यानं ही दुर्घटना झाल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले

**होल्ड - मुख्यमंत्री**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी मृतांच्या वारसांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची  मदत जाहीर केली आहे. राज्य शासनाने मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रूपयांची मदत जाहीर केली आहे.

<><><><><>

अल्जेरिया मध्ये आज झालेल्या बस अपघातात २५ जणांचा मृत्यू झाला असून ४४ जणं जखमी झाले आहेत. या बसमधून प्रवासी सेतिफ इथून राजधानी अल्जेरियाकडे जात असताना अल कर्मा इथं खोल दरीत बस कोसळली अशी माहिती अल्जेरिच्या प्रशासन विभागाने दिली आहे. सध्या या दुर्घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

<><><><><>

पाकव्याप्त काश्मीरमधे पाकिस्तान निरपराध जनतेवर अत्याचार करत असून जगानं याची दखल घ्यावी आणि पाकिस्तानला जाब विचारावा असं आवाहन भारतानं केलं आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत सांगितलं की पाकिस्तान अत्याचारांमुळे पाकव्याप्त काश्मीरमधे ४० हून जास्त लोकांचा बळी गेला आहे. भारतावर हल्ले करण्यासाठी प्रशिक्षित केलेल्या मुजाहीदीनच्या बंदुका आता पाकिस्तानवर उलटल्या असल्याचं पाकिस्तानी प्रधानमंत्र्यांच्या विशेष सहाय्यकांनी जाहीरपणे कबूल केलं असल्याची माहिती जयस्वाल यांनी दिली.

रशियन सैन्यातल्या १३९ भारतीय जवानांच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरु असल्याचं ते म्हणाले. परदेशी नोकरीचा प्रस्ताव स्वीकारताना सावधगिरी बाळगावी असा इशारा त्यांनी दिला. एजीव्ही रॅग्नर बोटीवरुन  बेपत्ता झालेल्या दोन भारतीय कर्मचाऱ्यांचा शोध घेण्यासाठी सरकार युक्रेन आणि रुमानियाच्या संपर्कात आहे

असं त्यांनी सांगितलं. यंदाच्या वर्षात आतापर्यंत बाराशे साठ भारतीयांना अमेरिकेने तडीपार केलं असल्याची माहिती त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. गेल्या वर्षी ही संख्या तीन हजार ५६७ होती असं ते म्हणाले.

**<><><><>**

नीलम आणि तोतापुरी जातीच्या आंब्यांची पहिली खेप हवाई मार्गे कर्नाटकहून मालदीवला रवाना झाली. यामुळं शेतकऱ्यांना स्थानिक बाजारपेठेपेक्षा ५० टक्के अधिक रक्कम मिळेल. अपेडा मार्फत ही निर्यात करण्यात आली.

**<><><><>**

जातीय हिंसाचारामुळं नेपाळमधल्या ४ जिल्ह्यात संचारबंदी सुरू आहे. या हिंसाचारामुळं ३ जणांचा मृत्यू झाला आहे. राष्ट्रपती राम चंद्र पौडेल आणि प्रधानमंत्री बालेन्द्र शाह यांनी जनतेला शांतता, संयम आणि एकता राखण्याचे आवाहन केले आहे.

**<><><><>**

गुप्तवार्ता अधिकारी अंकित शर्मा यांच्या हत्येप्रकरणी ५ जणांना दिल्लीच्या न्यायालयानं जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. दिल्लीत २०२० मधे झालेल्या दंगलीत अंकित शर्मा यांच्यावर जमावानं हल्ला केला होता, आणि त्यांचा मृतदेह नंतर गटारात सापडला होता. या प्रकरणी मुख्य आरोपी ताहिर हुसैन आम आदमी पार्टीचा नगरसेवक होता.

**<><><><>**

ग्लासगो इथं आयोजित २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत, बॉक्सिंगमधे भारताच्या जैस्मिन लंबोरिया, प्रीती पवार आणि अंकुश पंघालनं अंतिम फेरीत धडक मारत भारताची किमान 3 रौप्य पदकं निश्चित केली आहेत. उपांत्य फेरीत महिलांच्या आज ५७ किलो वजनी गटात जैस्मिननं लिसोथोच्या रापलंग मसलिलावर मात केली, तर ५४ किलो वजनी गटात प्रीतीनं आज झांबियाच्या

कॅथरीन म्वापेचा ५-० असा पराभव केला. अंतिम फेरीत तिचा सामना कॅनडाच्या स्कार्लेट डेलगाडो हिच्याशी होणार आहे. तर पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात अंकुश पंघालनं कॅनडाच्या जोशुआ ओफोरीवर ५-० असा विजय मिळवला.

ज्युदोमध्ये भारताची ३ पदकं निश्चित झाली असून अस्मिता डे, हर्ष सिंग आणि यामिनी मौर्य अंतिम फेरीत पोहोचले आहेत. अस्मिताने स्कॉटलंडच्या समर शॉ हिला, हर्ष सिंगने ऑस्ट्रेलियाच्या पेड्रो नेतो याला तर यामिनीनं दक्षिण आफ्रिकेच्या डोन ब्रेटेनबाच याला पराभूत केलं.

या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतानं आतापर्यंत एकूण १७ पदकं जिंकली आहेत, त्यात तीन सुवर्ण, १० रौप्य आणि ४ कांस्य पदकांचा समावेश आहे.

**<><><><><>**

तैपेई खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, भारताच्या उन्नती हुडा आणि तन्वी शर्मा यांनी उपांत्य फेरीत धडक मारली आहे. उपांत्यपूर्व सामन्यात उन्नतीनं भारताच्याच देविका सिहागचा २३-२१, २१-१६ असा पराभव केला. तर तन्वीनं थायलंडच्या सुपनिदा काटेथोंगवर २१-१५, १८-२१, २१-१४ असा विजय मिळवला.

//<><><><><>//